**असंघटित कामगारांसाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरावर "उच्चाधिकार प्राधिकरण" स्थापन करण्याबाबतचा दि.०१ जुलै २००४ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय, क्र. असंका-११२६/प्र.क्र.४५/कामगार-७ अ**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १८ मे, २०२६.

**वाचा :-** १. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.प्राधिकरण-२२००४/प्र.क्र.३३५/ कामगार-७ , दि.०१.०७.२००४.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन दि.०१.०७.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील असंघटित कामगारांसाठी विशेषतः ऊसतोड कामगार, बांधकाम मजूर, विटभट्टी मजुर, बिडी कामगार, हातमाग/यंत्रभाग कामगार, चिंध्या गोळा करणारे कामगार, रिक्षा ओढणारे कामगार, घरेलू कामगार टप्प्याटप्याने संघटित करुन सामाजिक सुरक्षेच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता शासन स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती.

केंद्र शासनाने दि.२१.११.२०२५ रोजी सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अधिसूचित केली असून, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० कलम ६ (१) मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय स्तरावर असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ (Unorganised Workers Social Security Board) गठीत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच सामाजिक सुरक्षा संहितेच्या कलम ६ (९) मधील तरतुदीनुसार राज्यस्तरावर असंघटित कामगारांकरिता राज्याचे असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ (State Unorganised Workers Social Security Board) गठित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

सामाजिक सुरक्षा संहितेच्या कलम १०९ (१) तसेच कलम १०९ (२) अन्वये केंद्र व राज्य शासनामार्फत असंघटित कामगार, गिग वर्कर्स ॲण्ड प्लॅटफार्म बेस्ड वर्कर्स यांचेसाठी खालील योजना अधिसुचित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(1) Life and disability cover
(2) Health and Maternity benefit
(3) Old age protection
(4) Education
(5) Any other benefit as may determined by the central government.
(6) Provident fund
(7) Employment injury benefit
(8) Housing
(9) Educational schemes for children
(10) Skill upgradation of workers
(11) Funeral assistance; and
(12) old age homes

केंद्र शासनाने लागू केलेल्या सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६ चा प्रारूप मसुदा दि. ०५ मे २०२६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आलेला आहे. असंघटित कामगारांसाठी सर्व संरक्षणे आता नवीन संहितेअंतर्गत नियंत्रित केली जाणार असून, असंघटित कामगारांसाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेले उच्चाधिकार प्राधिकरण ज्या उद्दिष्टांसाठी स्थापन करण्यात आले होते. ती सर्व उद्दिष्टे सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या मंडळामार्फत योजनांची अंमलबजावणी होणे अपेक्षित असल्यामुळे शासन निर्णयातील तरतुदी, प्रशासकीय संरचना, विद्यमान यंत्रणांशी सुसंगती तसेच असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ व उच्चाधिकार प्राधिकरणाच्या कामकाजाची द्विरुक्ती टाळण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन शासन निर्णय रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

असंघटित कामगारांसाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरावर “उच्चाधिकार प्राधिकरण” स्थापन करण्याबाबतचा संदर्भाधीन शासन निर्णय या शासन निर्णयाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सर्व सूचना, मार्गदर्शक तत्त्वे, प्रशासकीय आदेश व अंमलबजावणी कार्यपद्धती यापुढे लागू राहणार नाहीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक क्र. २०२६०५१८१२४६३८६८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C9638764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.05.18 12:48:29 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव (पत्राने)
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) सर्व सन्माननीय विधानपरिषद /विधानसभा सदस्य
८) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

९) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१५) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
१६) कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पुर्व), मुंबई
१७) विकास आयुक्त (असंघटित कामगार), प्रभादेवी, मुंबई
१८) सर्व विभागीय आयुक्त
१९) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी
२०) सर्व सह / उपसचिव, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय,मुंबई
२२) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२३) निवडनस्ती, कामगार-७अ कार्यासन